पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५१३ दिनांक - ०८/०७/२०२३**

### अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा,पुणे शहर

## पान टपरी मधुन गांजा,बंटा गोळया विकणारे परराज्यातील इसमांस अटक करुन कि रु ४७३५०/- चा ऐवज त्यामध्ये ११० ग्रॅम गांजा, ०३ किलो ५१५ ग्रॅम बंटा व इतर ऐवज जप्त

वरिष्ठांनी दिलेले आदेश व सुचनानुसार अंमली पदार्थ विरोधी पथक ०१ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विनायक गायकवाड यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी सहा पोलीस निरीक्षक शैलजा जानकर व स्टाफ यांना त्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्या नुसार दिनांक ०७/०७/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक १ कडील अधिकारी व स्टाफ वारजेमाळवाडी पोलीस ठाणे, पुणे कार्यक्षेत्रात पेट्रोलिंग करीत असताना पोलीस अंमलदार पांडुरंग पवार व सचिन माळवे, यांना त्यांचे बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,ओम साई पान शॉप कर्वेनगर गल्ली नंबर ८ चे समोर पुणे या ठिकाणी परराज्यातील इसम हा त्याचे ओम साई पान शॉप मधुन त्याचे ओळखीचे लोकांना गांजा,बंटा हे अंमली पदार्थ विक्री करीत आहे.नमुद प्रमाणे मिळालेले बातमीचे अनुषंगाने कायदेशिर कारवाई करणे बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी अधिनस्त स्टाफ,अधिकारी यांना सुचना दिल्या.

त्यानुसार विभागाकडील अधिकारी व स्टाफने सदर ठिकाणी सापळा रचुन कर्वेनगर गल्ली नंबर ८ समोर कॅनोल रोड येथील ओम साई पान शॉप या पान टपरी मध्ये छापा कारवाई केली असता नमुद ठिकाणी इसम नामे **रामबाबु देवनारायन महतो वय ३१ वर्षे, कर्वेनगर कॅनोल रोड गल्ली नंबर ८ चे समोर पुणे मुळ रा.गाव. रोहुवा, जि.सातावाडी, पोस्ट पोहबारवा राज्य बिहार** हा त्याचे ओम साई पान शॉप या पान टपरीत एकुण ११० ग्रॅम गांजा, ०३ किलो ५१५ ग्रॅम बंटा ,मोबाईल फोन किं.रु. ४७३५०/- चा ऐवज व अंमली पदार्थ अनाधिकाराने बेकायदेशिररित्या विक्री करता जवळ बाळगताना मिळुन आला म्हणुन त्याचे विरुध्द वारजे माळवाडी पो स्टे येथे गु र नं २७९/२०२३ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब), ii (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याबाबत पोलीस अंमलदार सचिन माळवे यांनी बिबवेवाडी पो स्टे येथे फिर्याद दिली आहे

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री.रितेश कुमार, मा. पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे,मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री.अमोल झेंडे, मा.सहा पो आयुक्त,गुन्हे १ श्री सुनिल तांबे, यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. विनायक गायकवाड, सहा पोलीस निरीक्षक, शैलजा जानकर, पोलीस अंमलदार मारुती पारधी, प्रविण उत्तेकर, विशाल दळवी, पांडुरंग पवार, संदिप शिर्के, राहुल जोशी, सचिन माळवे,सुजित वाडेकर, ज्ञानेश्वर घोरपडे, नितेश जाधव, रेहाना शेख, संदेश काकडे, योगेश मोहिते, यांनी केली आहे.